भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१२-१३/१९१

डीबीओडी.क्र. एलईजी.बीसी.३८/०९.०७.००५/२०१२-१३ ५ सप्टेंबर, २०१२

**सर्व अनुसूचित वाणिज्य बँकां (आरआरबी सोडून)**

महोदय,

**मंददृष्टी / अपंग असलेल्या व्यक्तींसाठी बँक सुविधा**

कृपया आमचे परिपत्रक क्र. डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी.९१/०९.०७.००५/२००७-०८ दि. जून ४, २००८ चा, संदर्भ घ्यावा. त्यात सांगण्यात आले होते की, दृष्टिदोष/मंददृष्टी व्यक्तींना, त्या व्यवहार करण्यास कायद्याने सक्षम असल्याने, कोणताही भेदभाव न करता चेकबुक सुविधा (तृतीय पक्ष चेक्ससह), एटीएम सुविधा, नेट बँकिंग सुविधा, लॉकर सुविधा, फुटकळ कर्जे, क्रेडिट कार्ड्स इत्यादि सुविधा दिल्या जाव्यात. ह्याशिवाय, आमचे परिपत्रक, डीबीओडी.क्र.एलईजी.बीसी,१२३/०९.०७.००५/२००८-०९ दि. एप्रिल १३, २००९ चाही संदर्भ घ्यावा. त्यात बँकांना सांगण्यात आले होते की, त्यांनी विद्यमान एटीएमजवळ पाय-या/भविष्यातील एटीएमजवळ चढ/उतार ठेवावा व नवीन एटीएम पैकी किमान एक तृतीयांश एटीएम हे बोलणारे व ब्रेल की पॅड्स असणारे ठेवावेत.

(२) अपंगत्व असलेल्या व्यक्तींच्या मुख्य आयुक्तांच्या कार्यालयाद्वारे आमच्या नजरेस आणण्यात आले आहे की, मंद-दृष्टी असलेल्या व्यक्तींना इंटरनेट बँकिंग सारख्या सुविधा मिळविण्यात अडचणी येत आहेत. ह्यासाठी बँकांना सांगण्यात येत आहे की त्यांनी वरील परिपत्रकांमधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे आणि अंधत्व/मंददृष्टी व इतर अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्व बँकिंग सुविधा देऊ कराव्यात.

आपला विश्वासु

(राजेश वर्मा)
मुख्य महा व्यवस्थापक

बँकिंग ऑपरेशन्स आणि विकास विभाग, केंद्रीय कार्यालय, १२ वा मजला, शहिद भगत सिंग मार्ग, मुंबई - ४००००१, दुरध्वनी : ९१-२२-२२६६१६०२, फॅक्सः ९१-२२-२२७०५६९१/२२७०५६९३, ईमेल : cgmicdbodco@rbi.org.in